B.P. SDO.

वाचले-: 1. म. जिल्हाधिकारी सो नंदुरबार यांचे कडील आदेश क्र/2017/ब/कक्ष-2/कावि 543 दि..23.8.2017
2. उप विभागीय अधिकारी तळोदा यांचे कडील आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995
3. नगर रचनाकार नंदुरबार यांचे कडील क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ता.शहादा/ संन.63/भु.क्र.16 ते 20/1134/ दि. 12.10.2017
4. इकडील कार्यालयीन आदेश क्रमांक /बिनशेती/कावि 85/2018 दिनांक 29.01.2018

---

क्रमांक/गांवठाण/कावि/ 46 /2017
उप विभागीय अधिकारी कार्यालय,
शहादा भाग शहादा
दिनांक /03/2018 20/3/2018

## आदेश

उपदघोतात नमुद म. जिल्हाधिकारी सो नंदुरबार यांचे कडील आदेश क्रमांक /2017 /ब / कक्ष-2/ कावि 543/ दिनांक.23.8.2017 चे आदेशान्वये ग्रामीण क्षेत्रातील गावठाणा व्यतीरीक्त भागातील विकास कामांकरीता परवानगी देण्याचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 18 मधील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील वर्ग-1 चे गावाकरीता बांधकाम परवानगी देणे, जोते तपासणी करणे इ. साठी मला प्रदान केलेल्या अधिकारानुसांर **मी, श्री लक्ष्मीकांत साताळकर, उप विभागीय अधिकारी शहादा भाग शहादा मौजे. कुकडेल ता. शहादा जि. नंदुरबार येथील सर्व्हे क्रमांक 63 मधील एकत्रिकरण केलेले भु.क्र.** 16+17+18+19+20अ+20 **ब चे एकुण क्षेत्र** 928.95 या क्षेत्रावर **अर्जदार श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी** यांनी मागणी केलेल्या बांधकाम परवानगी कामी नगर रचनाकार, नंदुरबार यांचेकडिल पत्र क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ता.शहादा/संन.63/भु.क्र. 16 ते 20/1134/ दि. 12.10.2017 अन्वये मौजे कुकडेल ता.शहादा येथील स.नं. 63 मधिल भूखंड क्र. 16+17+18+19+20अ+20ब एकत्रीकरणास वाणिज्य व रहिवास प्रयोजनार्थ अभिन्यास मंजुर केला आहे. त्याअनुंषगाने खालील अटी व शर्तीवर **मौजे. कुकडेल ता. शहादा जि. नंदुरबार येथील सर्व्हे क्रमांक 63 मधील एकत्रिकरण केलेले भु.क्र.** 16+17+18+19+20अ+20**ब चे एकुण क्षेत्र** 928.95 **चौ.मि. क्षेत्रावर तळ मजला, पहिला मजला,दुसरा मजला व तिसरा मजला बाधकामाचे एकुण क्षेत्र** 1110.19 चौ.मि. क्षेत्र **बांधकामास नगर रचनाकार यांचे कडील मंजुर अभिन्यासा नुसार रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.**

### अटी व शर्ती

1. **मौजे कुकडेल ता शहादा जिल्हा नंदुरबार** शिवारातील **सर्व्हे क्रमांक** 63 **मधील एकत्रिकरण केलेले भु.क्र.** 16+17+18+19+20अ+20**ब वर मंजुर** अभिन्यासास नगर रचनाकार नंदुरबार यांनी दिलेल्या **दिनांक** 12.10.2017 च्या शिफारस पत्रामधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील सदर अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर बांधकाम परवानगी रद्य ठरेल.

2.प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी सादर केलेल्या 7/12 उता-यानुसारचे क्षेत्र ग्राहय करुन बांधकाम नकाशास तांत्रिक मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे.

3.बांधकाम नकाशात दर्शविलेली भुखंडाची मापे जागेवर जुळली पाहिजे. तसेच नकाशात दर्शविलेले समास अंतर जागेवर सोडली पाहिजेत.

4.जागेवर जोत्यापर्यंतचे (Plinth Leval पर्यंत) बांधकाम झाल्यावर सदरहु बांधकाम हे मंजुर केलेल्या बांधकाम नकाशा प्रमाणे असल्याबाबत खात्री करुन घेतल्यावरच पुढील बांधकाम सुरु करावे.

5.सांडपाण्याचा निचरा योग्य रितीने होणेची व्यवस्था करणेची जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

6.मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम पुर्ण केल्याचे वास्तुविशारद/परवानाधारक इंजिनीयर यांचे प्रमाणपत्र (.बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (Completion Certificate) व भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) घेतल्याशिवाय सदरहु बांधकामाचा प्रस्तावीत वापर सुरु करु नये.

7.सदरहु भुखंडात कमीत कमी चार झाडे लावुन ती जोपासली पाहिजेत.

8.मालकी हक्काबाबत काही वाद उपस्थित झाल्यास आपण जबाबदार राहील. तसेच बांधकामाचे वेळी कामगारांना योग्य ती सुरक्षा व्यवस्था/ उपकरणे पुरविणेची जबाबदारी भुखंडधारक/ विकसकाची राहील.

9.छतावर पडणारे पावसाचे पाणी जमीनीत मुरण्याची अथवा साठविण्याची (Rain Water Harvesting) व्यवस्था करणे आवश्यक राहील.

10.प्रस्तावीत बांधकाम हे भारतीय मानकब्युरोने विहीत केलेल्या तरतुदीनुसार सुक्ष्म स्थापत्य अभियंत्याचे देखरेखीखाली भुंकप रोधक बांधकाम अर्जदार यांनी करणे आवश्यक आहे.

11 विषयाधीन जागेच्या चतु: सिमेबाबत, क्षेत्राबाबत अथवा कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्याची बांधकाम परवानगी सुधारीत करुन घेण्याची जबाबदारी आपली राहील.

12. प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 (सुधारणा अधिनियम) चे कलम 124ब अंतर्गत दुसरी अनुसूची भाग-1 व भाग-2 या तरतुदीनुसार **विकास शुल्क रुपये 50100/- मात्र** चलनद्वारे संबधीत लेख्याशिर्षामध्ये जमा केलेले आहे. प्रकरणी भविष्यात सदर रक्कमेबाबत काही तफावत निघाल्यास, नियमानुसार वाढीव रक्कम भरणे आपणास बंधनकारक राहील.

13. अर्जदार यांनी उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीएसए/2009/प्र.क्र. 108/कामगार/7अ/ दिनांक 17 जुन 2010 नुसार **बांधकाम मुल्यांवर 1 % उपकराची रक्कम रु** 155859/- **Bank Of India शाखा लोणखेडा येथे चलनाने भरणा केलेली आहे. तसेच बिनशेती आदेशातील शर्ती नुसार दंडाची रक्कम रु 500/- स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा शहादा येथे लेखाशिर्ष 0029 खाली चलनाने भरणा केलेली आहे.** तथापी भविष्यात / लेखा तपासणीत (AUDIT ) मध्ये रकमेबाबत तफावत निघाल्यास तफावतीची रक्कम अर्जदार यांना भरणा करणे बंधनकारक राहिल.

14.सदर बांधकाम परवानगी बांधकाम नकाशे मंजुर केल्यापासुन एक वर्षे वैध राहील. मुदतीत बांधकाम न केल्यास बांधकाम परवानगीस मुदतवाढ घेणे बंधनकारक राहिल.

15. प्रस्तुत बांधकाम प्रकरणी अर्जदार यांनी प्रस्तावासोबत सादर केलेले कागदपत्र मालकी हक्का बाबत ग्राहय धरण्यात आलेली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभुल किंवा खोटी आढळल्यास सदरची बांधकाम परवानगी आपोआप रद्य ठरविली जाईल व अर्जदार हे फसवणुकीच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयास पात्र ठरतील.

16. सदर भुखंडाचे बांधकाम करते वेळी बांधकाम साहित्यामुळे किंवा इतर कारणामुळे सार्वजनिक रहदारीस अडथळा / अडचण निर्माण करता कामा नये.

17. बांधकामाचे ठिकाणी जागा मालक, वास्तुशास्त्रज्ञ,बांधकाम कंत्राटदाराचे नाव, सर्व्हे क्रमांक,भुखंड क्रमांक भुखंडाचे क्षेत्र, बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक, बांधकाम रहिवास प्रयोजनार्थ आहे किंवा वाणिज्य प्रयोजनार्थ आहे या आशयाचा सविस्तर बोर्ड बांधकामाच्या ठिकाणी लावणे बंधनकारक आहे.

18. भुखंडावर बांधकाम करतांना बांधकाम साहित्यात फ्लाय अॅश आधारीत साहित्याचा वापर करावा.

16. दरवर्षी सदर प्लॉटचा बिनशेतीसारा संबंधीत तलाठी यांचेकडेस भरणा करण्यात यावा.
वरील अटी व शर्तीचे भंग झाल्यास, सदरची बांधकाम परवागनी रद्द समजण्यात येतील.

उपविभागीय अधिकारी ★ शहादा, भाग- शहादा

**लक्ष्मीकांत साताळकर**
**उप विभागीय अधिकारी**
**शहादा भाग शहादा**

प्रत-: श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी, रा. हल्ली नासिक
प्रत-: तहसिलदार शहादा यांचे कडेस माहिती व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.
प्रत-: नगर रचनाकार नंदुरबार यांचे कडेस माहिती व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.